पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 26/02/2020 (बुधवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 30 कि. मी. अंतरावर मौजा गौराळा येथे दिनांक 25/02/2020 चे 09:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. आशा अशोकराव मस्के, वय 61 वर्ष, रा. गौराळा यांच्या घरी किरायाने राहनारे संशयीत आरोपी नामे– 1) राजेन्द्र सिंदे व 2) दिलीप सिंदे, दोन्ही रा. गौराळा, जि. नागपूर यांनी संगनमत करून फिर्यादींच्या घराचे मध्यभागी असलेल्या दाराची कडी उघडुन घरात प्रवेश केले. तसेच आरोपीने फिर्यादींच्या घरातील गॅस सिलेंडर, स्टीलचे भांडे, गादी, ब्लॅकेट, दुलई, चादर, लगेज बॅग असा एकुण कि. 8,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम 454, 380, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक किशोर लोही 9146422633 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर मौजा कारगाव रेल्वे क्रॉसिंग शिवार येथे फिर्यादी नामे– प्रभाकर तुळशीराम कामडी, वय 42 वर्ष, रा. भिवापुर हे वन विभाग येथे नौकरीवर आहेत. वन विभाग कडुन कारगाव रेल्वे क्रॉसिंग येथे वन्य प्राण्यांवर देखरेख ठेवण्याकरीता 2 कॅमेरे लावण्यात आले होते. दिनांक 23/02/2020 ला फिर्यादीने कॅमेरे चेक केले तेव्हा दोन्ही कॅमेरे होते. परंतु दिनांक 24/02/2020 चे 07:00 वा. ते 07:30 वा. दरम्यान फिर्यादीने जावुन पाहीले असता त्या ठिकाणी कुड बॅक कंपनीचा कॅमेरा कि. 15,000/–रू. चा मुद्येमाल मिळुन आला नाही अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक डोइफोडे 9823301474 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 7 कि.मी. अंतरावरील पारडसिंगा येथे दिनांक 19/02/2020 चे 19:30 वा. ते 20:00 वा. दरम्यान एमएच– 40/बीएम– 0608 क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक आरोपी/मृतक नामे– राहुल कुमार डोंगरे, वय 23 वर्ष, रा. रिधोरा काटोल हा काटोल वरून पारडसिंगा येथे जात असतांना त्याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने चालविल्याने मोटरसायकल स्लिप झाली. या अपघातात राहुल डोंगरे याच्या कपाळावर मार लागल्याने त्याला उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता दिनांक 21/02/2020 रोजी त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कुमार रामदास डोंगरे, वय 52 वर्ष, रा. रिधोरा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण 9545363221 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 26 कि.मी. अंतरावरील मौजा उटी येथे दिनांक 24/02/2020 चे 12:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बंडु हरिचंद्र शेंडे, वय 36 वर्ष, रा. उटी यांचा मुलगा नामे– क्रिश बंडु शेंडे, वय 12 वर्ष हा गावातील परमात्मा एक च्या कार्यक्रमात असल्याने गावातील मुलान सोबत तेथे खेळत असतांना एमएच– 40/ बीजी– 8981 क्रमांकाच्या ट्रॅक्टरचा चालकाने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने चालविल्याने रिवर्स घेत असतांनी क्रिश शेंडे हा ट्रॅक्टरच्या मागचा चाकात आला. उपचाराकामी त्यास मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. कमलेश सोनटक्के 9422644538 हे करीत आहे.

3) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावरील मानेगाव टेक येथे दिनांक 24/02/2020 चे 23:00 वा. ते 23.30 वा. दरम्यान आजे– 11/जीबी– 2519 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने चालवुन नविन बिना क्रमांकाची मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– नितेश सेवकराम चंद्रवार, वय 34 वर्ष, रा. खवासा हे गंभीर जखमी होवुन त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर मोटरसायकल मागे बसलेले सोबती कमलकिशोर मनोहर सिंग, वय 45 वर्ष, रा. खवासा हे जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सर तर्फे परिमपोउपनि लक्ष्मी धोंडके यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 336, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. पुज्जलवार 7775092593 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर